# मार्क्स आणि लोहिया

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांमधील कालखंडात बुद्धिजीवी क्रांतिकारकांची एक नवी पिढी साऱ्या जगात जन्म पावली. सर्व जगात शांती, समता व समृद्धि यांवर आधारलेल्या एका नव्या विश्वसंस्कृतीच्या स्थापनेचे स्वप्न या पिढीने रंगविले. १९१७ मध्ये रशियात बोलशेव्हिक क्रांति झाली. त्यानंतर तीनच वर्षांनी हिंदुस्थानात गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यासाठी पहिले असहयोग आंदोलन झाले. या दोन ऐतिहासिक घटनांनी नव्या विश्वसंस्कृतीच्या दोन दिशा सूचित केल्या.

या परिवर्तनकारी कालखंडाचे डॉ. राम मनोहर लोहिया हे भारतीय प्रतिनिधी होते असे म्हणता येईल.

क्रांत्युत्तर रशियन शासन व समाजव्यवस्थेत लोहियांना काही दोष स्पष्टपणे जाणवत होते. तरीपण सर्वहारा शेतकरी–कामगारांची सत्ता स्थापन करण्याचा रशियातील प्रयोग हा नव्या विश्वसंस्कृतीचा पहिला प्रयोग आहे असे लोहियांना वाटत होते. पण तरीही रूढार्थाने ते कधीही मार्क्सवादी नव्हते. १९२० साली गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या व्यापक जन–आंदोलनाच्या निमित्ताने आशिया–आफ्रिकेतील साम्राज्यसत्तेखालील तमाम देशांच्या मुक्तिसंग्रामाची सुरुवात झाली असून त्यातून एक नवी संस्कृती उदय पावण्याची शक्यता डॉ. लोहियांना वाटत होती. म्हणून गांधीजींच्या विचारांकडे आणि आंदोलनाकडे लोहिया आस्थेने व अपेक्षेने पाहात होते. १९३२ साली लोहियांनी बर्लिन विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी घेतली. त्यासाठी त्यांनी 'मीठ व सत्याग्रह' हा प्रबंध–विषय निवडला होता. परंतु लोहिया रूढार्थाने गांधीवादीही नव्हते. कारण "गांधीवादी अथवा गांधीवादविरोधी तसेच मार्क्सवादी किंवा मार्क्सविरोधी असण्याची आवश्यकता नाही. गांधी व मार्क्सपासून घेण्या–

---

परामर्श, खंड ७, अंक ४, फेब्रुवारी १९८६.

सारखी अमूल्य अशी विचारसंपदा आहे..." गांधी व मार्क्स यांच्यासारख्या महान विचारवंतांच्या विचारांचा चिकित्सकपणे शोध घेण्याची प्रक्रिया निरंतर चालू राहिली पाहिजे असा लोहियांचा आग्रह होता. या दोन्ही द्रष्टया तत्त्व-चिंतकांच्या विचारातील काही कमतरता त्यांना दिसत होत्या. म्हणूनच त्यांनी "कोणाही एका विचारवंताचे तत्त्वज्ञान हा आपल्या राजकीय कृतीचा केंद्रबिंदु होऊ देता कामा नये; त्या तत्त्वज्ञानाचे सहाय्य जरूर घेतले पाहिजे. पण नियंत्रण स्वीकारता कामा नये," असा इषारा दिला आहे.

१९४२-४४ च्या 'चलेजाव' स्वातंत्र्य आंदोलनात भूमिगत असताना डॉ. लोहियांनी 'मार्क्सनंतरचे अर्थशास्त्र' हा छोटा परंतु अपूर्ण प्रबंध लिहिला. स्टालिनने बोल्शेव्हिक क्रांतीमधील आपल्या जुन्या सहकाऱ्यांचे निर्दालन करण्याची मोहीम १९३६-३७ साली सुरू केली. १९३८ मध्ये हिटलरच्या जर्मनीशी रशियाने अनाक्रमणाचा करार केला. तेव्हापासून लोहियांच्या मनात मार्क्सवादासंबंधी संदेह निर्माण होऊ लागला. १९४२ च्या आंदोलनाच्या वेळी भारतीय कम्युनिस्ट इंग्रजी साम्राज्यसत्तेच्या बाजूने उभे राहिले तेव्हा तर लोहियांचा मार्क्सवादाच्या काही आधारभूत सिद्धांताविषयीचा संदेह पक्का झाला. 'मार्क्सनंतरचे अर्थशास्त्र' या आपल्या प्रबंधात लोहियांनी मार्क्सवादाच्या आर्थिक आधाराला आव्हान दिले. १९६३ साली लोहियांच्या लेख-भाषणांचा 'मार्क्स, गांधी आणि समाजवाद' हा संपादित ग्रंथ प्रकाशित झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपासून भारतावरील चिनी आक्रमणापर्यंतच्या कालखंडात घडलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील घटनांच्या संदर्भात मार्क्सवाद व कम्युनिस्ट याविषयीच्या लोहियाविचारांची ओळख या ग्रंथा-द्वारे होऊ शकते.

आशिया-आफ्रिकेतील दरिद्री व अप्रगत देशाचा एक प्रतिनिधि आणि एक विश्वनागरिक या जोडभूमिकेतून लोहियांनी मार्क्सवादाची मूलग्राही चिकित्सा केलेली आहे.

"माणसाचे माणसाकडून होणारे शोषण थांबेल," "मानवाच्या व्यक्तिमत्वाचा उच्चतम विकास ही अखिल मानवजातीच्या विकासाची शर्त आहे," "माणसावर कोणी शासन करणार नाही तर उलट माणूसच वस्तूंचे शासन करील" इत्यादि मोठ्या उच्च व कर्णमधुर घोषणांतून प्रतीत होणाऱ्या मार्क्सवादाच्या अंतिम उद्दिष्टांचे लोहियांना आगळे महत्त्व वाटत नाही. कारण ते

म्हणतात, ' . . . क्रोपोट्किन, मार्क्स, गांधी एवढेच नव्हे तर ॲडम स्मिथ या सर्वांनीच... मनुष्यजातीच्या विकासाची अशी एक अवस्था कल्पलेली आहे की जिच्यात शोषण असणार नाही, शांतीचे साम्राज्य असेल, आणि माणसाचे व्यक्तित्व विकसित होईल. अशा प्रकारे समाजाची व जगाची पुनर्रचना केली जाईल."

म्हणून कोणत्याही विचारप्रणालीच्या अंतिम लक्ष्यापेक्षा त्याचे प्रत्यक्ष फलित व तिच्या मार्गाने विश्लेषणाचे ज्ञान करून घेणे लोहियांना महत्त्वाचे वाटते.

विश्वइतिहासाचे भौतिकवादी विश्लेषण हा मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा मुख्य गाभा आहे. या विश्लेषणानुसार भांडवलशाही हा मानवी इतिहासक्रमा-तील एक अनिवार्य टप्पा आहे. या कालखंडात भांडवलशाहीने मानवजातीची प्रगती केली या विधानाशी असहमती व्यक्त करताना लोहिया म्हणतात "भांडवलशाहीच्या अंतर्गत (म्हणजे युरोपीय) व बाह्य (म्हणजे युरोपीयेतर) अशा दोन प्रमुख कक्षा आहेत, हे लक्षात न घेता सबंध जगाची अर्थव्यवस्था एकसारखीच समजण्याची चूक झाली आहे. ... भांडवलशाहीने आपल्या उत्क्रांतीच्या प्रारंभिक अवस्थेत गौर एकतृतीयांश जगाला क्रांतिकारक तंत्र-विज्ञानाचे फायदे व अफाट संपत्ती मिळवून दिली तर गौरेतर दोनतृतीयांश जगाला सक्ती उत्पादनयंत्रणा, दारिद्र्य व दुःख दिले".

भांडवलशाहीविकासाच्या मार्क्सप्रणीत गृहीत तत्त्वातील या मूलभूत विसंगतीसंबंधी स्पष्टीकरण मिळाले पाहिजे. ते मिळणार नसेल तर ते गृहीत तत्त्व अर्धसत्य मानावे लागेल. भांडवलशाहीने आपल्या उत्क्रांतीच्या काळात प्रगतीच्या संदर्भात जगाची दोन शकले केली अशी पुस्ती मार्क्सच्या विधानाला जोडली तरच ते पूर्ण सत्य होईल.

मार्क्सने ग्रथित केलेले 'अतिरिक्त मूल्य' मार्क्सच्या नजरेसमोर अस-लेल्या पश्चिम युरोपीय भांडवलशाहीने आपल्या बाह्य म्हणजे युरोपीयेतर वर्तुळांतून कमाविले ही वस्तुस्थिती आहे. आशिया-आफ्रिकेतील अप्रगत देशां-मधून युरोपीय भांडवलशाहीने प्रचंड नफा मिळविला याची मार्क्सलाही कल्पना होती. मार्क्सने अनेक ठिकाणी त्याचा उल्लेख केला आहे. परंतु वस्तुस्थितीची ही जाणीव ही मार्क्सच्या मूळ सिद्धांताला जोडलेल्या परिशिष्टासारखी आहे. ती जाणीव हे मार्क्सच्या सिद्धांताचे अभिन्न अंग नाही. साम्राज्यवादी प्रभुत्व,

साम्राज्यशाही शोषण अस्तित्वात होते हे मार्क्सने मान्य केले आहे. पण हे शोषण व प्रभुत्व हे भांडवलशाहीचेच एक अंग होते किंवा युरोप व युरोपेतर आशिया-आफ्रिकेतील देश यांचे नाते शोषक आणि शोषितांचे होते अशा रितीने भांडवलशाहीविकासाचे संपूर्ण व सम्यक् चित्र मार्क्सवादाने चितारलेले नाही."

मार्क्सच्या भविष्यवाणीप्रमाणें भांडवलशाही देशांत क्रांती होईल इतके दारिद्र्य वाढलेले नाही. उद्योगधंद्यात वारंवार संकटे उद्‌भवतील व त्यातून पुढे सार्वत्रिक आर्थिक आपत्ती कोसळतील अशीही अपेक्षा होती. परंतु अद्याप तरी कोणत्याही देशांत तसे झालेले नाही. भांडवलशाहीचा विकास ज्या देशांत झाला आहे त्या देशांत ती न कोसळता तुलनेने विकासाच्या बाबतीत खूपच मागास असलेल्या चीनसारख्या देशांत ती कोलमडली ही निर्विवाद वस्तुस्थिती आहे. क्रांती होण्याची शक्यता असलेल्या देशांच्या मार्क्सच्या यादीत चीनचा समावेश कधीच नव्हता.

भांडवलशाही आपल्या विकासाच्या प्रक्रियेतच आपल्या शत्रूला जन्म देते व आपली कबर खणते; ती सर्ववंचित अशा कामगारांची संख्या वाढवीत असते कामगारवर्ग संघर्षासाठी सिद्ध होतो, त्याला संघटित करणारा कामगारांचा पक्ष-देखील आपोआप उदयास येतो आणि मग भांडवलदार व कामगार यांच्यात संघर्षाची ठिणगी पडते आणि अखेर त्यात भांडवलशाहीचा विनाश होतो. मार्क्स म्हणतो, ' हे सर्व भांडवलशाही जेथे सर्वांत विकसित आहे तेथे प्रथम घडेल. ' परंतु वस्तुस्थिती याच्या उलट आहे हे सर्वमान्य सत्य आहे. भांडवलशाहीविकासांत इंग्लंड-जर्मनीपेक्षा तुलनेने मागे असलेल्या रशिया-चीनमध्ये भांडवलशाही प्रथम कोसळली; इंग्लंड-जर्मनीत ती नष्ट झाली नाही; या देशांत व अमेरिकेत तिची पकड घट्टच होत आहे; त्या देशांत भांडवलशाहीने आपली कबर खणू शकणाऱ्या शत्रूंना किंवा त्यांच्या प्रबल संघटनांनाही जन्म दिलेला नाही. लोहिया सांगतात, " मार्क्सचा सिद्धांत संपूर्णपणे चुकीचा सिद्ध झाला आहे . . . मी मार्क्सवादी असतो तर त्यात सुधारणा केली असती. " मार्क्सने सांगितलेल्या तीन्ही गोष्टी घडल्या आहेत. भांडवलाचे केन्द्रीकरण झाले आहे, कामगारवर्गाचे सामाजी-करण झाले आहे, गरीबी वाढली आहे. पण जगाच्या दोन भिन्न विभागांत या गोष्टी घडल्या आहेत. भांडवलशाही विकासाच्या मार्क्सवादी विश्लेषणास अशी पुस्ती जोडली तर असा निष्कर्ष निघतो की ज्या देशांत गरीबी वाढत राहील, त्या देशांत भांडवलशाही कोसळेल.

मार्क्सवाद किंवा कम्युनिझम फक्त उत्पादनातील भांडवलशाही संबंध नष्ट करू पाहतो; परंतु भांडवलशाही उत्पादनपद्धती जशीच्या तशी स्वीकारतो. कम्युनिझम व भांडवलशाही यांच्यात दिसणारा विरोध वरकरणी आहे. ती वस्तुतः जुळी भावंडेच आहेत. केंद्रित उत्पादनतंत्र हा दोघांचाही आदर्श आहे. 'या दृष्टीने अमेरिकेचा फोर्ड व रशियाचा स्टॅलिन किंवा भांडवलशाही व कम्युनिझम यांच्या आर्थिक उद्दिष्टांत फारसा मूलभूत फरक नाही.' रशिया–अमेरिकेचे विशालकाय यंत्रे व प्रचंड भांडवल यावर आधारलेले केन्द्रित उत्पादनतंत्र ज्या देशांत विकसित उत्पादनपद्धती आधीपासूनच अस्तित्वात आहे अशा पाश्चात्य प्रगत देशांतच उपयोगी पडेल. दोनतृतीयांश जगात तिचा उपयोग नाही. कारण तेथील उत्पादनपद्धती एकतृतीयांश जगाच्या मानाने अत्यंत मागासलेली आहे; आणि तेथे महाकाय उत्पादनतंत्रासाठी लागणारे भांडवलही उपलब्ध नाही; शिवाय लोकसंख्याही अफाट आहे.

आणि येथेच राष्ट्रा–राष्ट्रांतील अगदी कम्युनिस्ट राष्ट्रांतील देखील विषम प्रगतीची प्रकर्षाने जाणीव होते. मार्क्सवादी विचारांत त्याची उपेक्षा केलेली आहे. समता, संपन्नता व शांति यावर आधारलेली नवी विश्वसंस्कृती निर्माण करायची असेल तर देशांतर्गत विषमतेप्रमाणे राष्ट्रा–राष्ट्रांतील विषमता नष्ट केली पाहिजे. आपल्यातील सैद्धांतिक उणीवांमुळे मार्क्सवादाला ते शक्य नाही.

राष्ट्रांतर्गत विषमता नाहीशी करण्यात व समतेची प्रस्थापना करण्यातील मार्क्सवादाच्या यशापयशाची छाननी लोहियांनी रशियातील मार्क्सवादी प्रयोगाच्या संदर्भात केली आहे. 'प्रत्येकाला त्याच्या गरजेपुरते आणि प्रत्येकाकडून त्याच्या कुवतीनुसार' ही घोषणा तूर्त मागे ठेवली असून 'प्रत्येकाला त्याच्या श्रमानुसार' ही घोषणा पुढे आली आहे. 'कम्युनिस्टांचा सिद्धांत कोणताही असला तरी वस्तुस्थिती अशी आहे की रशियामधील श्रमजीवींच्या विभिन्न गटांचा दर्जा व त्यांची मिळकत अलग अलग आहे. कम्युनिझम वर्गांतील संघर्ष नष्ट करतो असे फार तर म्हणता येईल. अर्थात् त्यामुळे वर्ग नष्ट होतात असे मात्र नाही. उलट ज्यांचा सामाजिक दर्जा आणि उत्पन्न निश्चित केले आहे अशा नव्याच जाती कम्युनिझममधून जन्माला येतात असे दिसते. वर्गविनाशाच्या प्रयत्नांतून आपण नव्या जाती तर निर्माण करीत नाहीं ना असा धोक्याचा इशारा त्यांतून मिळतो.'

लोकशाही, सदाचरण, मनःशांती, जागतिक शांती आणि सुसंस्कृतता ही

कोणत्याही समाजाची सर्वसाधारण उद्दिष्टे असतात. मार्क्सच्या मताप्रमाणे कम्युनिझमची आर्थिक उद्दिष्टे साध्य झाली की, त्यांतूत आपोआप समाजाची ही सामान्य उद्दिष्टेही भरभराटतील. परंतु हे खरे नाही. आर्थिक उद्दिष्टांच्या प्राप्तीच्या प्रयत्नांबरोबर ही नैतिक उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागतील. "त्यासाठी समाजाच्या आर्थिक व नैतिक उद्दिष्टांचा ज्यामध्ये परस्पराशी सुसंगत पण अलग अलग विचार केला आहे, असे एखादे एकसंध तत्त्वज्ञान विकसित करावे लागेल."

"भांडवलशाहीच्या विनाशाविना अविकसित दोन तृतीयांश जगाला प्रगतीच्या दिशेने पहिले पाऊलसुद्धा टाकता येणार नाही" असे सांगून "वर्गसंघर्ष ही सामाजिक परिवर्तनाची चालकशक्ती आहे" या शब्दात लोहियांनी वर्गसंघर्षाचे समर्थन केले आहे. परंतु समाजाची आर्थिक उद्दिष्टे व नैतिक उद्दिष्टे यांना साजेसे वर्गसंघर्षाचे स्वरूप असले पाहिजे असा लोहियांचा आग्रह आहे. आर्थिक उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी नैतिक उद्दिष्टांची उपेक्षा करता येणार नाही. वर्गसंघर्षाचे औचित्य दूरच्या भविष्यकालातील कसोटचा न वापरता नजिकच्या काळातील प्रचीतीच्या आधाराने सिद्ध करता आले पाहिजे. कम्युनिस्टांचा वर्गसंघर्ष या कसोटीला उतरत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर वर्गसंघर्षाच्या प्रत्येक कृतीत समाजाच्या नैतिक उद्दिष्टांची प्रचीति आली पाहिजे.

"आज वर्गसंघर्षाचा सिद्धांत अशा विकृत स्वरूपात मांडला जात आहे की त्यानुसार आजचे असत्य उद्याच्या सत्यासाठी आहे, आजची हत्या उद्याच्या स्वास्थ्यासाठी आहे, लोकशाहीचा आजचा मृत्यू उद्याच्या परिपूर्ण लोकशाहीसाठी आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याचा आजचा होम उद्याच्या विश्वैक्यासाठी आहे असे एखाद्याला सिद्ध करता येते."

मार्क्सप्रणीत क्रांतीसाठी व वर्गसंघर्षाकरिता बलप्रयोग, कपट, असत्य व दुराचरण यांची अनिवार्य आवश्यकता आहे काय ? मार्क्सने कोठे कोठे बलप्रयोगाचा उल्लेख केला असला तरी मार्क्सची बुद्धी मूलत: व सर्वसाधारणपणे लोकशाहीवादी आहे. भांडवलशाहीच्या आपल्या विशिष्ट विश्लेषणामुळेच मार्क्स प्रथमपासून अखेरपर्यंत लोकशाहीचा समर्थक होता. ज्या देशात लोकतांत्रिक पद्धती रूढ होती व ती अधिक गतिमान होण्याची शक्यता होती अशा इंग्लंड–

जर्मनीमध्ये क्रांतीसाठी बलप्रयोगाची आवश्यकता मार्क्सला वाटली नसावी. रशियाची परिस्थिती त्या उलट होती. म्हणून लेनीनने क्रांतीसाठी हिंसा, कपट, असत्य, डावपेच यांचा आश्रय घेतला असेल. " पण लेनीनच्या उपा–यांनी वर्गसंघर्ष खरोखरीच यशस्वी झाला तर यशप्राप्तीचा आनंद तरी मिळेल. पण तीही शक्यता नाही. एवढी पापे करून देखील तो आनंद मिळणे शक्य नाही." शिवाय " मार्क्सने कल्पिलेली समाजाची आर्थिक उद्दिष्टे जर भविष्य–काळात मृगजळ असल्याचे सिद्ध होणार असेल तर ती उद्दिष्टे साध्य करण्या-करिता समाजाच्या नैतिक व सांस्कृतिक उद्दिष्टांचा बळी देणे योग्य आहे काय ?"

दोनतृतीयांश जगातील भांडवलशाही व सरंजामशाही यांना त्वरित मूठमाती दिली पाहिजे. " भांडवलशाहीमुळे शरीराचे व आत्म्याचे दारिद्र्य सतत वाढत राहील. भांडवलशाहीने आशिया–आफ्रिकेतील माणसाला अर्धमानव व अर्धपशु बनविले आहे. साऱ्या जीवनावर ऱ्हासाची व मृत्यूची दुर्गंधी पस–रली आहे. ऱ्हास मानवी शरीराचा, मानवाच्या आर्थिक ध्येयाचा आणि मृत्यू मानवी आत्म्याचा व मानवाच्या नैतिक मूल्यांचा. ज्या भांडवलशाहीने या परिस्थितीत समाजाला आणून ठेवले आहे ती मुळातच उखडून टाकली पाहिजे व त्यासाठी फार वेळ लागता कामा नये."

परंतु मार्क्सवाद हा भांडवलशाहीचा पर्याय होण्यास असमर्थ आहे हा डॉ लोहियांच्या मांडणीचा ठाम निष्कर्ष आहे. कारण मार्क्सवाद हा अखेर युरोपीय संस्कृतीचाच एक भाग आहे. या संस्कृतीचेच दोन भाग असलेल्या " भांडवल–शाही व कम्युनिझम यापैकी कोणीही संपूर्ण मानवी व्यक्तित्व तसेच मानवजाती यांना सम्यक प्रावीण्य कसे मिळवून देता येईल या मूलभूत प्रश्नाचा विचार केलेला नाही. शोषणाचा अंत करून त्याद्वारे मानवी व्यक्तित्वाचा संपूर्ण विकास आणि राष्ट्राराष्ट्रांतील समता यावर आधारलेली जागतिक व्यवस्था निर्माण करण्याची भाषा कम्युनिझम बोलत असतो हे खरे. निरोगी परस्पर-स्पर्धेद्वारे एक नवी विश्वव्यवस्था निर्माण करण्याची भाषा पूर्वी भांडवलशाहीनेही केली होती. त्या भाषेइतकीच कम्युनिझमची ही मोघम उद्दिष्टे फसवी व निरर्थक आहेत. परंतु भांडवलशाही व कम्युनिझम यापैकी कोणीही आपल्या मोघम भाषेला भरीव आदर्शांत साकारित करण्याचा प्रयत्न केलेला नाही." भांडवलशाही देशाप्रमाणेच कम्युनिस्ट देशही "…. राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रां–

तर्गत वर्धिष्णु जीवनमान, उद्योगधंदे व शेती अधिक उत्पादक व व्यापक प्रमाणावर करण्यासाठी अति आधुनिक विज्ञानाचा उपयोग, आरामशीर घर व वर्धिष्णु जीवनमान " हे सर्व करण्यात मश्गुल आहेत म्हणजेच आपल्या युरोपीय संस्कृतीतील संचिताचे रक्षण व संवर्धन करण्यात व्यस्त आहेत.

समता, समृद्धी व शांती यांवर आधारलेली नवी विश्वसंस्कृती लोहियांच्या मतानुसार तीच तत्त्वप्रणाली निर्माण करू शकेल की जी "आपल्याच देशांतील जनतेची समता व समृद्धि साधण्याऐवजी साऱ्या जगामधील मानवात समता व समान विकास साधण्याचा उद्देश नजरेसमोर ठेवील. आणि सर्व माणसे आपल्या देशातच समान आहेत असे नाही तर देशा–देशांतील माणसांचा दर्जा समान असला पाहिजे यासाठी प्रयास करील."

४१५/१ शनिवार पेठ, पुणे ३० श्रीपाद केळकर